
# एम.फिल., पीएच.डी. प्रवेश परीक्षा २१ पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या एम.फिल., पीएच. डी. प्रवेशासाठीची परीक्षा दि. २१ आणि २२ मे रोजी होणार आहे. विद्यापीठाच्या परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाच्या वतीने या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 'स्पेशल ॲडमिशन ड्राईव्ह' आयोजित केले आहे. ऑफलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा होणार आहे; त्यासाठीचे वेळापत्रक परीक्षा मंडळाकडून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

# एमफील, पीएचडी प्रवेश परीक्षा २१पासून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांसोबत विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा पुढील आठवड्यापासून सुरू होत आहेत. यामध्ये एमफील व पीएचडी पदवीसाठी अनुक्रमे २० व २१ मे रोजी ऑफलाइन प्रवेश परीक्षा होणार आहे. तर पीजी डिप्लोमाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २० ते २३ मे या कालावधीत होणार आहेत.



प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना काही आक्षेप असल्यास त्यांनी १५ मे अखेर कळवायचा असून त्यानंतर १६ मे रोजी अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांना २६ मार्चपासून सुरूवात झाली आहे. पहिल्या दोन टप्प्यातील अभ्यासक्रमांच्या परीक्षा संपल्या असून तिसऱ्या टप्प्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे नियोजन केले आहे. याअंतर्गत २० मे पासून पीजी डिप्लोमा अंतर्गत विविध विषयांच्या परीक्षा होणार आहेत. यामध्ये टीचर ट्रेनिंग एज्युकेशन या विषयाची परीक्षा सुरू होत आहे. विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागातील परीक्षा केंद्रावर या परीक्षा होणार आहेत. कम्युनल हार्मनी अँड सोशल पीस व ह्यूमन राइट इन ड्युटीज या विषयाच्या परीक्षा २० ते २३ मे या कालावधीत राज्यशास्त्र विभाग परीक्षा केंद्रावर होणार आहेत. तर डिप्लोमा इन हिंदी ट्रान्सलेशन या विषयाची परीक्षा १६ ते १८ मे या कालावधीत हिंदी विभागाच्या परीक्षा केंद्रावर होणार आहे.

पुढारी

# सर्व विद्यापीठांसाठी




## • येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी
## • राज्यातील १४ विद्यापीठांचा समावेश

- कागदपत्रांची सुरक्षितता व गोपनीयता राहणार
- विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये एकसूत्रता येणार



**पुढारी विशेष**

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांसाठी आता एकात्मिक संगणकप्रणाली (आययूएमएस) लागू करण्यात येणार असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून याची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये एकसूत्रता येऊन प्रशासनाचे कामकाज पारदर्शी होणार असून, विद्यार्थ्यांसाठी सोयीचे ठरणार आहे.

गेल्या वर्षी मुंबई विद्यापीठातील परीक्षेमधील गोंधळाचा प्रकार राज्यभर गाजला होता. याची दखल घेत राज्यपालांनी कुलगुरूंच्या संयुक्त बैठकीत हा विषय उपस्थित केला.

त्यानंतर शासनस्तरावर सर्व विद्यापीठांसाठी एकच संगणकप्रणाली विकसित करून त्यामध्ये परीक्षा विभाग, संलग्नता, सामान्य प्रशासन, वित्त विभागासह सर्व विभागांचे संगणकीकरण करण्याबाबत चर्चा झाली. सेंट्रल डेटा सेंटर मुंबई येथे तयार करण्यास सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंनी मान्यता दिली. शासनातर्फे ही संगणकप्रणाली विकसित **पान ९ वर**

> “सर्व विद्यापीठांसाठी एकच संगणकप्रणाली लागू होणार असल्याने विद्यार्थी व शैक्षणिक प्रक्रिया राबविण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी काही प्रमाणात कमी होतील. एकसूत्रता आल्याने अडचणीच्या काळात विद्यापीठे एकमेकांना सहाय्य करू शकतील.
>
> - **डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

Kolhapur Edition
14 May, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

# सर्व विद्यापीठांसाठी एकच संगणकप्रणाली

**(पान १ वरून)** करण्याचे काम महा-आयटीकडे सोपविण्यात आले असून, कामकाज सुरू झाले आहे. यासाठी टेंडर प्रक्रिया राबवून यूएसटी-ग्लोबल कंपनीला वर्कऑर्डर दिली आहे. कंपनीने सर्व विद्यापीठांच्या संगणक प्रणालींचा अभ्यास करून त्यासंदर्भात ले-आऊट तयार केला असून, त्यास विद्यापीठांची मान्यता घेण्यात आली आहे. प्रत्येक विद्यापीठामार्फत समन्वयासाठी वरिष्ठ दर्जाचा अधिकारी प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यात आला आहे.

संगणकप्रणालीचे पाच भागांत विभागणी करण्यात आली आहे. यात विद्यार्थी, महाविद्यालये, शिक्षक, कर्मचारी, शैक्षणिक व प्रशासन याचा समावेश आहे. प्रत्येक भागासाठी पाच संगणकतज्ज्ञांची नेमणूक केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मान्य झालेल्या ले-आऊटनुसार संगणक प्रणाली विकसित करण्याचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. संबंधित कंपनीची तांत्रिक विभागाची टीम विद्यापीठांना भेटी देत आहे. विद्यापीठांनी सुचविलेल्या दुरुस्त्या विचारात घेऊन 'यूजर ॲक्सटन्स टेस्ट' घेतली जाणार आहे. त्यानंतर विद्यापीठांना यूजर आयडी व पासवर्ड दिला जाणार आहे. संगणकप्रणाली विकसित झाल्यानंतर केंद्र व राज्य सरकारला पाठविण्यात येणारे सर्व अहवाल तत्काळ मिळतील. एकसूत्रता आल्याने अडचणीच्या काळात विद्यापीठे एकमेकांना मदत करू शकतील.

संगणक प्रणालीमुळे विद्यापीठे व महाविद्यालयांचे कामकाज सोपे होणार आहे. कागदपत्रांची गोपनीयता व सुरक्षितता पाळली जाणार आहे. छोट्या-मोठ्या ५२ प्रकारच्या मॉड्यूल्सचे संगणकीकरण झाल्याने सर्व विभागाचे कामकाज पूर्णपणे संगणकीकृत होणार आहे. काही विद्यापीठांनी चालू शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश परीक्षा या संगणक प्रणालीतून घेण्यास सुरुवात केली आहे.

# एम.फिल.,पीएच.डी. प्रवेश परीक्षा २१ पासून सुरू होणार

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील एम.फिल., पीएच.डी. (स्पेशल ॲडमिशन ड्राईव्ह) प्रवेश परीक्षा दि. २१ व २२ मे रोजी ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. यासाठी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. परीक्षा विभागाच्या वतीने या परीक्षेचे अंतिमपूर्व वेळापत्रक (ड्राफ्ट प्रोग्राम) तयार करण्यात आला आहे. परीक्षा वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. या वेळापत्रकात काही आक्षेप, त्रुटी असल्यास ते परीक्षा नियुक्ती विभागाकडे बुधवारी (दि. १५) सायंकाळी सहा वाजेपर्यंत पाठविण्यात यावेत. काही आक्षेप, त्रुटीबाबतचे लेखी समक्ष किंवा ई-मेल पाठविण्यात यावेत. १५ मे नंतर आलेली कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार जाणार नाही. दि. १६ रोजी अंतिम वेळापत्रक जाहीर केले जाणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी पत्रकाद्वारे दिली.

सकाळ



**कोल्हापूर : प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे सुरू झालेल्या रेशीम शास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षेस बसलेले तरुण शेतकरी.**

# शेतकऱ्यांनी दिली रेशीमशास्त्र परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे सुरू झालेल्या रेशीम शास्त्र पदविका व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची परीक्षा आज तरुण शेतकरी व अधिकाऱ्यांनी दिली. परीक्षेसाठी एकूण ३८ विद्यार्थी बसले होते. अधिविभागातर्फे २०१७-१८ ला रेशीम शास्त्र पदविका व पदव्युत्तर पदविका हा अभ्यासक्रम सुरू झाला. यंदा अभ्यासक्रमाचे दुसरे वर्ष होते. अभ्यासक्रमाला शेतकरी व अधिकारी अधिकाऱ्याने प्रवेश घेतला आहे. आज त्यांची परीक्षा होती. सकाळी ११ ते २ या वेळेत पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी 'खाद्य वनस्पती लागवड आणि त्यांचे व्यवस्थापन' हा इंग्रजी, तर दुपारी ३ ते ६ या वेळेत पदविका अभ्यासक्रमासाठी 'खाद्य वनस्पती लागवड आणि त्यांचे व्यवस्थापन' हा मराठी माध्यमाचा पेपर झाला.

Kolhapur, Kolhapur-Today
14/05/2019 Page No. 2